:: प्रेस नोट ::

रत्नागिरी जिल्हयामध्ये दहशत निर्माण करुन तसेच कायदा हातात घेवून लोकांचे शरीराविरुध्दचे गुन्हे गुन्हे करणारे 1) इरफान उर्फ दाऊद अल्लाउद्दीन होडेकर वय 28 रा.झारणी रोड, बाजारपेठ, रत्नागिरी, 2) जहीर मेहमुद काझी वय 41 रा.गवळीवाडा रत्नागिरी यांना मुंबई पोलीस कायदा कलम 55 प्रमाणे रत्नागिरी जिल्हयातून 2 वर्षाकरीता हद्दपार करणेचे आदेश डॉ.प्रविण मुंढे, पोलीस अधीक्षक रत्नागिरी यांनी पारीत केलेले आहेत.

इरफान उर्फ दाऊद अल्लाउद्दीन होडेकर याचे विरुध्द रत्नागिरी शहर पोलीस स्टेशन या ठिकाणी सन 2016 पासून खुनाचा प्रयत्न, दुखापत, अंमलीपदार्थ तसेच जहीर मेहमुद काझी याचेवर सन 2016 पासून अंमली पदार्थ विरोधी कायदयानुसार गुन्हे दाखल आहेत.

वरील नमुद इसम याचे अशा वर्तणुकीमुळे लोक त्याचे विरोधात उघडपणे बोलत नाहीत. त्यामुळे सदर इसमाचे मनोबल वाढून ते अशाच प्रकारे शरीराविरुध्दचे गुन्हे करीत रहाण्याची शक्यता होती. नमुद इसमावर कायदयाचा वचक बसविणे आवश्यक असल्याने तसेच यापुढे असे इसम तयार होऊ नयेत व त्यांचेकडून समाजातील व्यक्तींच्या जिवितास धोका निर्माण होऊ नये याकरीता तसेच जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी यासाठी त्यास रत्नागिरी जिल्हयातून 2 वर्षाकरीता मुंबई पोलीस कायदा कलम 55 नुसार हद्दपार करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
रत्नागिरी पोलीस